RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ७९(२)] गुरुवार, जून २५, २०२६/आषाढ ४, शके १९४८ [पृष्ठे ४ किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २४८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून, २०२६.

**आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/ कोषा प्रशा-४.—**ज्याअर्थी,** ओळख पटविण्याकरिता आधार क्रमांकाच्या वापरामुळे, व्यक्तींना सोयीस्कर व अखंडपणे अर्थसहाय्य, लाभ व सेवा मिळविणे शक्य होते, ओळख पटविण्यासाठी बहुविध दस्तऐवजांची गरज टळते, प्रक्रिया सुलभ होतात आणि पारदर्शकता व कार्यक्षमतेला चालना मिळतेः

**आणि ज्याअर्थी,** भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाशी (UIDAI) विचारविनिमय केल्यानंतर, दिनांक ११ मार्च, २०२६ च्या पत्र क्रमांक १३ (४)/२०२०-ईजी- दोन (खंड- पाच) याद्वारे, 'सुशासनासाठी (सामाजिक कल्याण, नवोपक्रम, ज्ञान) आधार अधिप्रमाणन नियम, २०२०' (यात यापुढे ज्याचा निर्देश, 'उक्त नियम' असा केला आहे) याच्या नियम ३ च्या पोट-नियम (१) अन्वये विहित केलेल्या प्रयोजनांसाठी, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई (यात यापुढे ज्याचा निर्देश, 'उक्त विभाग' असा केला आहे) यास अशी मुभा दिलेली आहे की, उक्त विभागास, आधार क्रमांक धारकाची ओळख पटविण्यासाठी अधिप्रमाणन करण्याची मुभा देण्यात यावी आणि अधिप्रमाणन करताना आधार क्रमांकाचा वापर करण्याची आणि उक्त नियमांच्या नियम ५ तसेच 'आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६' (यात यापुढे ज्याचा निर्देश,'उक्त अधिनियम' असा केला आहे) याच्या कलम ४ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ब) च्या उप-खंड (दोन) अन्वये ते अधिसूचित करण्याची परवानगी देण्यात यावी;

**आणि ज्याअर्थी,** आधार अधिप्रमाणन, (एक) सुशासनासाठी डिजीटल मंचांच्या वापरास चालना देणे (दोन) सामाजिक कल्याण लाभांच्या ऱ्हासास प्रतिबंध करणे आणि त्यांचे लक्ष्यित वितरण सुनिश्चित करणे, आणि (तीन) उक्त नियमांच्या नियम ३ च्या पोट-नियम (१) अन्वये विहित केल्याप्रमाणे कर्मचारी, निवृत्तिवेतनधारक, आणि लाभार्थी यांकरिता सुरक्षित व कार्यक्षम सेवा देऊन त्याद्वारे त्यांचे जीवनमान उंचावणे आणि उक्त प्रयोजनासाठी आधार अधिप्रमाणन करणे स्वेच्छा तत्त्वावर असेल आणि उक्त अभिकरण, सुशासनास

पाठबळ देणे, लाभांच्या गैरवापरास प्रतिबंध करणे, आणि परवलीचा शब्द (ओटीपी), बायोमेट्रिक, किंवा ई-केवायसी पद्धती वापरताना सेवांचे वितरण सुरक्षित व कार्यक्षम करण्यास चालना देणे यांकरिता लॉग इन करताना केवळ ओळख पडताळणीसाठी आणि सेवार्थ, निवृत्तिवेतनवाहिनी, राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना (एनपीएस), शासकीय भविष्यनिर्वाह निधी (जीपीएफ), आणि कर्जे व अग्रिमे परिमाणे, यांसंबंधातील गुंतागुंतीचे व्यवहार करताना आधार अधिप्रमाणन करील. (यात यापुढे ज्याचा निर्देश वापरावयाची बाब (बाबी) असा केला आहे).

**त्याअर्थी, आता,** सुशासनासाठी (सामाजिक कल्याण, नवोपक्रम, ज्ञान) आधार अधिप्रमाणन नियम, २०२० च्या नियम ५ तसेच आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे (लक्ष्यित ) वितरण) अधिनियम, २०१६ च्या कलम ४ च्या पोट-कलम (४) मधील खंड (ब) चे उप-खंड (दोन) यांच्या अनुसार, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील बाबी अधिसूचित करीत आहेत :—

**१.** लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र शासन, अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे, येथे अधिप्रमाणनाच्या प्रयोजनासाठी आधार क्रमांक धारकाची पूर्वसूचित संमती मिळवील.

(२) उक्त नियमांच्या नियम ३ च्या पोट-नियम (२) नुसार, आधार अधिप्रमाणन हे स्वेच्छा तत्त्वावर असून, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र शासन, आधार क्रमांक धारकास ओळख पटवणाऱ्या पर्यायी व व्यवहार्य साधनांची माहिती देईल आणि आधार अधिप्रमाणन करण्यास नकार देणाऱ्या किंवा असमर्थ असणाऱ्या, आधार क्रमांक धारकास कोणतीही सेवा नाकारणार नाही :—

(क) कायमस्वरूपी खाते क्रमांक (पॅन) पत्र;

(ख) महाराष्ट्र शासनाने दिलेले सेवा ओळखपत्र; आणि

(ग) सक्षम प्राधिकाऱ्यास स्वीकारण्यायोग्य असलेले शासनाने दिलेले इतर कोणतेही छायाचित्र ओळखपत्र.

**२.** ही अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविकुमार लिंगनवाड,**
शासनाचे उप सचिव.

**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 24 June, 2026

*NOTIFICATION*

AADHAR (TARGETED DELIVERY OF FINANCIAL AND OTHER SUBSIDIES. BENEFITS AND SERVICES) ACT, 2016.

No. Sankirna-2022/C.R.29/Kosha Prasha-4.—Whereas the use of Aadhaar number to establish identity enables individuals to receive subsidies, benefits and services in a convenient and seamless manner, obviates the need for multiplicity of documents to establish identity, simplifies processes and promotes transparency and efficiency :

And whereas the Ministry of Electronics and Information Technology, Government of India, after consultation with the Unique Identification Authority of India (UIDAI), had allowed *vide* its letter No. 13(4)/2020-EG-II (Vol-V), dated 11th March, 2026 to the Directorate of Accounts and Treasuries, Government of Maharashtra Mumbai (hereinafter referred to as the said department) for the purposes prescribed under sub-rule (*1*) of rule 3 of the Aadhaar Authentication for Good Governance (Social Welfare, Innovation, Knowledge) Rules, 2020 (hereinafter referred to as the said Rules) that the said Department may be allowed to perform authentication and be permitted the use of Aadhaar number during authentication for establishing identity of Aadhaar number holder and notify the same under rule 5 of the said rules read with sub-clause (*ii*) of clause (b) of sub-section (*4*) of section 4 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies. Benefits and Services) Act, 2016 (hereinafter referred to as the said Act) :

And whereas, the Aadhaar authentication shall be performed for the purpose of (*i*) enabling usage of digital platforms for good governance, (*ii*) preventing dissipation and ensuring targeted delivery of social welfare benefits, and (*iii*) promoting ease of living by facilitating secure and efficient access to services for employees, pensioners, and beneficiaries as prescribed under sub-rule (1) of rule 3 of the said Rules and the performance of Aadhaar authentication for the said purpose shall be on voluntary basis and that the said Agency shall perform the Aadhaar authentication only for identity verification during login and critical transactions across Sevaarth, Nivruttivetanwahini, National Pension Scheme (NPS), Government Provident Fund (GPF), and Loans and Advances modules, to support good governance, prevent misuse of benefits, and enable secure, efficient service delivery using OTP, biometric, or e-KYC methods.(hereinafter referred to as the use case(s)).

Now, therefore, in pursuance of rule 5 of the Aadhar Authentication for Good Governance (Social Welfare, Innovation, Knowledge) Rules, 2020 read with sub-clause (ii) of clause (b) of sub- section (4) of section 4 of the Aadhar (Targeted) Delivery of Financial and Other Subsidies Benefits and Services) Act, 2016 the Government of Maharashtra hereby notifies the following, namely :—

1. The Directorate of Accounts and Treasuries, Government of Maharashtra, as provided in the Act, shall obtain the informed consent of the Aadhaar number holder for the purpose of authentication herein.

(2) As per sub-rule (*2*) of rule 3 of the said Rules, Aadhaar authentication is on voluntary basis the Directorate of Accounts and Treasuries, Government of Maharashtra shall inform the Aadhaar number holder of alternate and viable means of identification and shall not deny any service to he Aadhaar number holder for refusing to, or being unable to, undergo Aadhaar authentication, namely :—

(a) Permanent Account Number (PAN) Card;

(b) Service Identity Card issued by the Government of Maharashtra;

and

(c) Any other government-issued photo identity document acceptable to the competent authority.

2. This notification shall come into effect from the date of its publication in the *Official Gazette*.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVIKUMAR LINGANWAD,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.